# RISHI LASER LIMITED

**Registered Office** : 612, Veena Killedar Industrial Estate, 10-14, Pais Street, Byculla (W), Mumbai - 400 011.
Tel. : +91 22 2307 5677, 2307 4585, 2307 4897 Fax : +91 22 2308 0022
Email : rlcl.mumbai@rishilaser.com Website : www.rishilaser.com
CIN : L99999MH1992PLC066412

**15th November, 2021**
**RLL/31/2021-22**

To,
The Secretary
BSE Limited
Floor 25, P. J. Towers,
Dalal Street
Mumbai- 400 001

**Script Code: 526861**
**ISIN: INE988D01012**

**Sub: Intimation of newspaper publication of Unaudited Financial Results (Standalone and Consolidated) for the quarter and half year ended 30th September, 2021**

Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended we are attaching herewith copies of newspaper advertisement pertaining to Unaudited Financial Results (Standalone and Consolidated) for the quarter and half year ended 30th September, 2021. The advertisement are published in "Business standard" (English Newspaper) and "Navakal" (Marathi Newspaper) on 15th November, 2021.

This is for your kind information and records.

Thanking You,

Yours Faithfully
For **Rishi Laser Limited**

Rishi Laser Limited

**Vandana Machhi**
**Company Secretary**
*Enclosed a/a*

**Business Standard**
MUMBAI EDITION

Printed and Published by Sangita Kheora on behalf of Business Standard Private Limited and Printed at M/s. Dangat Media Private Limited, 22 Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai, 400708 and M/s. Dainik Bhaskar, Plot no. 10.11, Sector B, Industrial Area, Govindpura, Bhopal (M.P.)-462023. & Published at H/4 & I/3, Building H, Paragon Centre, Opp. Birla Centurion, PB.Marg, Worli, Mumbai- 400013

Editor : Shailesh Dobhal

RNI NO: 66308/1996

Readers should write their feedback at feedback@bsmail.in
Fax : +91-11-23720201

For Subscription and Circulation enquiries please contact:
Ms. Mansi Singh
Head-Customer Relations
Business Standard Private Limited.
H/4 & I/3, Building H, Paragon Centre, Opp. Birla Centurion, PB.Marg, Worli, Mumbai - 400013
E-mail: subs_bs@bsmail.in
"or sms, REACHBS TO 57575

Overseas subscription: (Mumbai Edition Only)
One year subscription rate by air mail INR 51765 : USD 725

# इंदापूर कृषी बाजार समिती निवडणुकीचे फुंकले रणशिंग! पाटील- भरणे गटात लढत

**इंदापूर** - पुणे जिल्ह्यातील राजकिय दृष्ट्या महत्वाची समजल्या जाणाऱ्या इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीचे रणशिंग फुंकले गेले आहे. कारण या बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत २१ नोव्हेंबर रोजी संपत असल्याने जिल्हा निबंधकांनी निवडणूक कार्यक्रमानुसार प्रारूप मतदार यादी तयार करण्याचे आदेश दिले आहे.

यंदाच्या निवडणुकीत माजी सहकार मंत्री व भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील आणि राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पॅनलमध्येच होणार आहे.कारण मागील निवडणुकीत भरणे यांच्यासोबत असलेले पुणे जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे यावेळी हर्षवर्धन पाटील पाटील यांच्या सोबत आहेत. १९ जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत ११ मतदारसंघाच्या सोसायटी गटावर भाजपचे वर्चस्व आहे तर ४ ग्रामपंचायत मतदारसंघात राष्ट्रवादी प्रबळ आहे.इंदापूर तालुक्यात ११४ ग्रामपंचायती आणि २५१ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आहेत.या संस्थांमधून तसेच हमाल, मापाडी आणि तोलारी मतदार संघातून १ आणि व्यापारी मतदारसंघातून २ असे बाजार समितीचे संचालक निवडले जाणार आहेत.या निवडणूक पार्श्वभूमीवर बाजार समितीने सर्व मतदार संघाची सदस्य सूची तयार केली असून पुढील आठवड्यात प्रारूप यादी जाहीर होणार आहे. स्व.खासदार शंकरराव पाटील यांनी १९६०मध्ये स्थापन केलेल्या या बाजार समितीची सत्ता २०१६ पर्यंत हर्षवर्धन पाटील पाटील यांच्याकडे होती.

# मिरज - कागवाड एसटी धावली पण दगडफेक करून काचा फोडल्या

■ सांगली

**विलिनीकरणाच्या** मागणीवरून जिल्ह्यातील एस.टी. कर्मचाऱ्यांचा संप चिघळला आहे. सलग दुसऱ्या दिवशी मिरज- कर्नाटक सीमेवरील कागवाडसाठी मिरज स्थानकातून एसटी सोडण्यात आली. मात्र या एस.टी.वर दगडफेक करून काचा फोडण्यात आल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी चालक चंद्रकांत पांडुरंग सुतार यांनी अज्ञाताविरूद्ध मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संप मोडीत काढण्यासाठी महामंडळाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. काल शनिवारी मिरज आगारातून दोन एस.टी.

गाड्या कर्नाटक सीमेपर्यंत सोडण्यात आल्या. एका गाडीच्या दोन फेऱ्या झाल्या होत्या. तोडफोड करण्यात आलेल्या गाडीची चौथी फेरी सुरू होती. ही गाडी म्हैसाळ ते कर्नाटक सीमेवरील कागवाडजवळ गेली असता काल सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास दबा धरून बसलेल्या अज्ञातांनी एस.टी.वर समोरून दगडफेक केली. त्यावेळी काच फुटली. त्यानंतर एस.टी. कर्नाटक सीमेपर्यंत रवाना करण्यात आली. त्या ठिकाणी प्रवाशांना उतरवून रात्री उशिरा ती गाडी मिरजेत दाखल झाली. दगडफेकीत एस.टी. चे सुमारे ६ हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचे चालक सुतार यांनी सांगितले.

# पुणे ग्रामीण भागात जमावबंदी लागू जिल्हाधिकारी देशमुखांची घोषणा

**पुणे**- त्रिपुरामध्ये कथित हिंसाचार प्रकरणाचे पडसाद महाराष्ट्रात उमटले होते. मालेगावसह नांदेड आणि अमरावतीत पुकारण्यात आलेल्या बंदला काही समाजकंटकांनी हिंसक वळण दिले. याचे लोण इतर जिल्ह्यांत पोहोचू नये यासाठी पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात आजपासून सात दिवस कलम १४४ लागू करण्यात आले आहे. पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी ही घोषणा केली. पुणे ग्रामीणसह जळगावमध्येही कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी देशमुख यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे की, पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात रविवार १४ ते शनिवार २० नोव्हेंबर या कालावधीत जमावबंदी (कलम १४४) लागू करण्यात येत आहे. कोणतीही व्यक्ती इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप, ट्विटर, फेसबुक आदी समाज माध्यमांद्वारे जातीय तणाव निर्माण करणाऱ्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच आक्षेपार्ह पोस्ट टाकणे किंवा शेअर करणे अशी कृत्ये केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ग्रुप अॅडमिनची राहणार आहे. समाजमाध्यमांनी चुकीची माहिती, अफवा जाणीवपूर्वक पसरवणे कायद्याने गुन्हा आहे. तसेच पाच व पाच पेक्षा जास्त लोकांनी एकत्र येणे, सभा घेणे, जातीय तेढ निर्माण करणाऱ्या मजकुराचे फलक लावणे किंवा त्या प्रकारच्या घोषणा देण्यास मनाई करण्यात आली आहे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी या आदेशात म्हटले आहे.

# बोरिवलीत लिंक रोडवरील ऑलिव्ह अपार्टमेंटला आग

**मुंबई**- बोरिवली पश्चिम लिंक रोड येथे असलेल्या ऑलिव्ह अपार्टमेंटमधील तळमजल्याला आज सायंकाळी आग लागल्याची घटना घडली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या होत्या. तळमजल्याला लागलेल्या आगीच्या ज्वाला मोठ्या प्रमाणावर पसरल्या होत्या. त्यामुळे परिसरात धुराचे लोट निर्माण झाले होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या आगीत कोणतीही जिवितहानी झालेली नाही. मात्र मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाल्याचे समजते आहे.

# भिवंडीत मेट्रोच्या कामातील सांगाडा कोसळल्याने ५ कामगार जखमी

■ भिवंडी

**ठाणे**- भिवंडी - कल्याण या मेट्रो प्रकल्प ५ चे काम ठाणे ते धामणकर नाका दरम्यान सुरु आहे.हे काम सुरू असताना अचानक लोखंडी पिलरच्या सळईचा सांगाडा कोसळल्याची घटना काल शनिवारी दुपारी तीनच्या सुमारास घडली. भिवंडीतील मराठा पंजाब हॉटेल जवळ अंजुरफाटा परिसरात घडलेल्या या अपघातात ५ कामगार जखमी झाले असून त्यातील ३ जणांची प्रकृती गंभीर आहे. राहनाळ ग्रामपंचायत हद्दीतील अंजुरफाटा येथील मराठा पंजाब हॉटेलसमोर मेट्रोच्या पिलरचे काम सुरू होते. याठिकाणी पुलाचे बांधकाम करण्यासाठी लोखंडी खांब उभे-आडवे एकावर एक असे रचून सुमारे ३० ते ४० फूट उंचीचा एक सांगाडा तयार केला होता. या सांगाड्यातील एक खांब निखळला आणि लोखंडी खांबांचा सांगाडाच जमिनीवर कोसळला.

अपघातामध्ये पाच मजूर किरकोळ जखमी झाले. जखमी मजुरांना तातडीने शुश्रूषा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. जखमींची नावे मोहम्मद शाहरुख, मोहब्बत मोहबुत, मोहम्मद अब्दुल अहद, मोहम्मद शकील, मोहम्मद नावेद अशी आहेत. मेट्रो प्रशासनाने घटनास्थळी पडलेल्या लोखंडी खांबांना हटवून मेट्रोचे काम नियोजनानुसार सुरू राहावे यासाठी आवश्यक ते उपाय केल्याचे सांगितले. सुदैवाने घटना घडली त्यावेळी एकही वाहन रस्त्यावरून जात नव्हते. त्यामुळे मोठी हानी टळली.

# भगीरथ भालकेंच्या अनुपस्थित पत्नीची विविध कार्यक्रमांना आवर्जून हजेरी

**सोलापूर** - गेल्या काही महिन्यांपासून पोटनिवडणुकीत पराभव झालेले भगीरथ भालके हे जनतेसाठी संपर्कहीन बनत चालले आहेत.मात्र त्यांच्या पत्नी डॉ.प्रणिता भालके या मात्र आपल्या पतीच्या अनुपस्थितीत मोठ्या धैर्याने विविध कार्यक्रमांना हजेरी लावताना दिसत आहेत.

पोटनिवडणुकीत हार पत्करावी लागल्याने मानसिक खच्चीकरण झाले असताना विठ्ठल साखर कारखानाही थकीत उसबीलामुळे अडचणीत आला आहे. ऊस सभासद सातत्याने सरकोली येथील घरापर्यंत येऊ लागले आहेत. कारखान्याच्या मदतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यापर्यंत प्रयत्न केले. पण त्यातून हाती काही लागले नाही. विशेष म्हणजे विरोधकांपेक्षा आपल्याच पक्षातील नेते अडचणीत आणू पाहत आहेत. त्यामुळे भगीरथ हे लोकांना टाळताना दिसत आहेत. पण त्यांच्या पत्नी डॉ.प्रणिती या मात्र ही परिस्थिती बदलण्यासाठी मैदानात उतरल्या आहेत. संपूर्ण मंगळवेढा तालुक्यात त्या क्रिकेट स्पर्धा, विकास कामे आणि कुणाच्याही सुखदुःखात सहभागी होत आहेत.पती मनाने खचले असले तरी त्या खचलेल्या नाहीत. त्यांनी कोलमडलेली परिस्थितीत मतदारांचा संपर्क तोडायचा नाही. परिस्थितीवर मात्र करण्यासाठी त्यांची चाललेली ही धडपड पाहून जनतेमध्येही त्यांच्याबद्दल सहानुभूती दिसत असून त्यांच्या वाटचालीचे कौतुक होत आहे.

# पदयात्रेवेळी भाई जगताप आणि झिशान सिद्दीकींत वाद

**मुंबई**- वाढती महागाई, बेरोजगारीविरोधात संपूर्ण देशभरात काँग्रेसचे आज रविवारपासून जनजागरण अभियान सुरू झाले. या अभियानाचा एक भाग म्हणून मुंबई काँग्रेसतर्फे आज राजगृह ते चैत्यभूमीपर्यंत पदयात्रा काढण्यात आली. मात्र पदयात्रेच्या ट्रकवर चढण्यावरून मुंबई युवक काँग्रेसचे अध्यक्ष आणि आमदार झिशान सिद्दीकी आणि मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांच्यात भरस्त्यावरच वाद झाल्याने काहीकाळ गोंधळ उडाला. या पदयात्रेसाठी एका ट्रकला सजवून रथाचे स्वरूप देण्यात आले होते. काँग्रेस नेत्यांनी या ट्रकचा ताबा घेण्यास सुरू केली होती.मात्र ट्रकवर चढताना मुंबई युवक काँग्रेसचे अध्यक्ष आणि आ. झिशान सिद्दीकी यांना अडवले.



# ९० कोटींच्या ड्रग्जसह २ विदेशी महिला तस्करांना दिल्ली विमानतळावर अटक

**नवी दिल्ली**- सध्या देशभर ड्रग्जविरोधी शोध मोहीम राबवली जात असून दिल्ली विमानतळावर दोन विदेशी महिलांना ९० कोटींच्या ड्रग्जसह अटक करण्यात आली. सध्या या दोन्ही महिलांची कसून चौकशी सुरू आहे. कस्टम अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार १२ आणि १३ नोव्हेंबरच्या रात्री अबुधाबीमार्गे नैरोबिहून भारतात आलेल्या दोन महिलांच्या सुटकेसमध्ये १२.९ किलो हिरोईन सापडले ज्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ९० कोटी इतकी किंमत आहे. सुटकेसमध्ये हे ड्रग लपवण्यासाठी खास कप्पे तयार करण्यात आले होते. मात्र दिल्ली विमानतळावरील सीमा शुल्क विभागाच्या श्वान पथकातील श्वानांमुळे या विदेशी महिला तस्कर हाती लागल्या आता हे अमली पदार्थ कोणी आणि कोणासाठी पाठवले होते याची चौकशी सुरु आहे. काही दिवसांपूर्वीच एनसीबीने मुंबई आंतरराष्ट्रीय टर्मिनल आणि सहार कार्गो येथून चार कोटींचे हेरॉईन जप्त केले होते. या प्रकरणी गुजरातमधील बडोद्याच्या एका नागरिकाचा तपास करण्यात येत आहे.



# सीबीआय, ईडीच्या प्रमुखांचा कार्यकाळ दोनवरून पाच वर्षांपर्यंत वाढवला

**केंद्र सरकारचा नवा अध्यादेश जाहीर**

**नवी दिल्ली**- केंद्रीय अन्वेषण ब्युरो आणि अंमलबजावणी संचालनालयाच्या प्रमुखांचा कार्यकाळ हा दोन वर्षांचा असतो. मात्र हा कार्यकाळ पाच वर्षांनी वाढवण्यासाठी केंद्र सरकारने दोन अध्यादेश काढले आहेत. त्यानुसार केंद्रीय अन्वेषण ब्युरो व सक्तवसुली संचालनालयाच्या प्रमुखांचा कार्यकाळ वाढवण्यात आला असून, मोदी सरकारने रविवारी याबाबतचा अध्यादेश काढला असल्यामुळे ईडी व सीबीआयच्या प्रमुखांना पाच वर्षांपर्यंत या पदावर राहता येणार आहे. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी दोन्ही अध्यादेशांवर स्वाक्षरी केली आहे. सर्वोच्च संस्थांच्या प्रमुखांना अध्यादेशानुसार दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर दरवर्षी तीन वर्षांपर्यंत मुदतवाढ दिली जाऊ शकते.

दरम्यान, ईडीचे संचालक एस.के.मिश्रा यांचा कार्यकाळ पुढील आठवड्यात संपणार आहे. त्याच्याशी संबंधित एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक आदेश दिला आहे. असामान्य परिस्थितीतच कार्यकाळ वाढवला जाऊ शकतो, असं न्यायालयानं या आदेशात म्हटलं होतं. म्हणजे सरकारने हा अध्यादेश अशा वेळी आणला आहे जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने ईडी प्रमुख एसके मिश्रा यांच्या कार्यकाळ वाढवण्यावर प्रश्न उपस्थित केले होते. सरकारने केवळ दुर्मिळ आणि अपवादात्मक प्रकरणांमध्येच कार्यकाळ वाढवावा, असे न्यायालयाने म्हटले होते. मिश्रा हे २०१८ पासून ईडी प्रमुख म्हणून कार्यरत आहेत आणि त्यांना कार्यकाळ एक वर्षाची वाढीवतर १७ नोव्हेंबर रोजी संपत आहे. तर दुसरीकडे संसदेचे हिवाळी अधिवेशन लवकरच सुरु होत असताना हा अध्यादेश काढण्यात आला आहे. सध्या आयपीएस सुबोध जैस्वाल हे सध्याचे सीबीआय प्रमुख आहेत. मागील काही महिन्यांपासून महाविकास आघाडी सरकारमधील मंत्र्यांच्या मागे सीबीआय अन् ईडीचा ससेमिरा लागला आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख सध्या ईडीच्या कोठडीत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक नेते तपास यंत्रणांच्या रडारवर आहेत. या यंत्रणांचा भाजपकडून राजकीय हेतूने प्रेरित होऊन गैरवापर केला जात असल्याचा आरोप महाविकास आघाडीतील नेते करत आहेत.





# सिल्लोडमध्ये शेतकऱ्यावर बिबट्याचा हल्ला

**औरंगाबाद**- शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यावर अचानक बिबट्याने हल्ला केल्याची घटना सिल्लोड तालुक्यातील वसईमध्ये रविवारी सकाळी आठच्या सुमारास घडली. त्यात ते गंभीर जखमी झाले असून या हल्ला झाल्यानंतर त्यांनी आरडाओरड केल्याने बाजुचे शेतकरी मदतीला धावल्याने त्याचा जीव वाचला. दिलीप सरोदे (४८) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेमुळे वसईमध्ये ग्रामस्थांमध्ये खळबळ उडाली आहे. दिलीप हे नेहमीप्रमाणे आपली पाळीव जनावरे घेऊन वसई शेतशिवारातील आपल्या शेतात गेले. जनावरांना चारा टाकून शेतात काम करत असताना बिबट्याने त्यांच्यावर समोरच्या बाजूने हल्ला चढवला.